# अस्मिता

२०२२-२३

## भारत शिक्षण संस्थेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय

### माकणी ता.लोहारा जि.उस्मानाबाद

**NAAC Accredited - "B" Grade**

संलग्न : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.



# भारत शिक्षण संस्था, उमरगा जि.उस्मानाबाद

## कार्यकारी मंडळ



अमोल मोरे
अध्यक्ष



अश्लेष मोरे
उपाध्यक्ष



जनार्दन साठे
सरचिटणीस



पद्माकरराव हराळकर
चिटणीस



डॉ. सुभाष वाघमोडे
सहचिटणीस



सुरेश बिराजदार
संचालक



रविंद्र गायकवाड
संचालक



अजिंक्य मोरे
संचालक



डॉ. अमित पाटील
संचालक



भानुदासराव माने
संचालक



शेषेराव पवार
संचालक



त्र्यंबकराव इंगोले
संचालक



सुनिल माने
संचालक



रामराव इंगोले
संचालक



डॉ. विजय पाटील
संचालक



तानाजी फुगटे
संचालक



दिगंबर बिराजदार
संचालक



विठ्ठलराव नरसाळे
संचालक



अशोकराव पाटील
संचालक



राजेंद्र माने
संचालक



प्राचार्य डॉ. जी.एच. जाधव
प्राचार्य

भारत शिक्षण संस्थेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय

माकणी ता.लोहारा जि.उस्मानाबाद

# अस्मिता

: प्रकाशक :

**प्राचार्य डॉ.एच.एन.रेडे**

: प्रमुख संपादक :

**प्रा.डॉ.काकासाहेब सुरवसे**

या अंकातील कविता, लेख, कथा, ललित व इतर साहित्यात
व्यक्त केलेल्या मताशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# संपादक मंडळ

: प्रमुख संपादक :

**प्रा.डॉ.काकासाहेब सुरवसे**

## मराठी विभाग

मार्गदर्शक
**प्रा.डॉ.काकासाहेब सुरवसे**

विद्यार्थी संपादक
**कसबे सुरज प्रकाश**

## हिंदी विभाग

मार्गदर्शक
**प्रा.डॉ.आर.एम.खराडे**

विद्यार्थी संपादक
**कांबळे सोनाली धनराज**

## इंग्रजी विभाग

मार्गदर्शक
**प्रा.डॉ.एस.डी.मुगळे**

विद्यार्थी संपादक
**चव्हाण पुजा राजेंद्र**


वार्षिक अंक स्वामित्वाबद्दल तसेच नियतकालिकाचे अन्य तपशीलवार निवेदन नमुना ४ (नियम ८ प्रमाणे)

| | | |
|---|---|---|
| १. प्रकाशनाचे स्थळ | - | भारत शिक्षण संस्थेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, माकणी |
| २. प्रकाशकाचे नाव | - | **प्राचार्य डॉ.एच.एन.रेडे** |
| राष्ट्रीयत्व | - | भारतीय |
| पत्ता | - | भारत शिक्षण संस्थेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, माकणी ता. लोहारा, जि. उस्मानाबाद. |
| ३. संपादक | - | **प्रा.डॉ.काकासाहेब सुरवसे** |
| राष्ट्रीयत्व | - | भारतीय |
| पत्ता | - | भारत शिक्षण संस्थेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,माकणी ता. लोहारा, जि. उस्मानाबाद. |
| ४. मुद्रकाचे नाव | - | **नक्षत्र ऑफसेट, लातूर.** |
| राष्ट्रीयत्व | - | भारतीय |
| पत्ता | - | हनुमान चौक, महाराष्ट्र बँकेसमोर, एल.सी. बिल्डिंग, लातूर. मो. ९४२३३ ४९५१८. |

मी प्राचार्य डॉ. एस.टी. गायकवाड जाहीर करतो की, वर नमुद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे सत्य आहे.

**डॉ.एच.एन.रेडे**
प्राचार्य



## शिक्षणमहर्षी तात्यारावजी माधवरावजी मोरे (आबा)

संस्थापक व चिटणीस, भारत शिक्षण संस्था उमरगा

कार्यकाल : जुलै १९४१ ते एप्रिल १९७९, संस्था स्थापना : जुलै १९४१

“स्वातंत्र्यपूर्व काळात हैद्राबादच्या निजामाची निजामशाही, रझाकाराची दडपशाही, उर्दूतून शिक्षणाची सक्ती अशा अंधःकारात 'तमसो मा ज्योतिर्गमय' हे ब्रीद वाक्य घेवून तात्यारावजी मोरे आबांनी भारत शिक्षण संस्थेची स्थापना २ जुलै १९४१ रोजी केली. हजारोच्या जीवनात ज्ञानकिरण पसरवणारा हा दिवस. यादिवशी ज्ञानाची मुहूर्तमेढ रोवली गेली. भारत विद्यालय, उमरगा हे पहिले युनिट सुरू केले. त्यानंतर प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाची सोय उमरगा तालुक्यातील परिसरात केली. गोरगरिबांच्या मुलांना अल्पदरात भोजनाची सोय व्हावी म्हणून जनता बोर्डींग सुरू केले. उच्च शिक्षणासाठी खेडयातील बहुजन समाजाच्या मुलांना दूर शहरी जावे लागे. या परिसरातील बहूजन समाजातील मुले शिकली पाहिजेत या तळमळीने आबांनी १९५९ साली श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय सुरू केले. मराठवाडयातील ग्रामीण भागात सुरू झालेले हे पहिलं महाविद्यालय. जनसामान्यांचा कळवळा असलेले, शिक्षणातून नवसमाज निर्माण करणारे, जातीपातीच्या पलीकडे जावून समाज मन जोडू पाहणारे, निवैर, करडया शिस्तीचे पण आभाळमन असलेले अखेरच्या श्वासापर्यंत संस्थेची धुरा वाहणारे आबा खरोखरच शिक्षणमहर्षी आहेत.”



## कर्मयोगी श्रीधरराव मोरे (अण्णा)

अध्यक्ष, भारत शिक्षण संस्था उमरगा
कार्यकाल : १५/०४/१९७९ ते २०/१०/२००२

भारत शिक्षण संस्थेची धुरा १९७९ नंतर कर्मयोगी श्रीधरराव मोरे (आण्णा) यांनी समर्थपणे सांभाळली. तात्यारावजी मोरे आबांनी लावलेल्या ज्ञानवृक्षाचे रूपांतर प्रचंड वटवृक्षात करण्याची धडपड आण्णांनी केली. संस्थेचा शाखा विस्तार केला. बीएसएस कला आणि विज्ञान महाविद्यालय माकणी, श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय पदव्युत्तर अभ्यासक्रम एम.कॉम, एम.ए. व एम.एस्सी. सुरू केले. १९८८ पासून शासनाच्या नव्या शैक्षणिक धोरणाला अनुसरून किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम सुरू करण्यात आले. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अभ्यासक्रम सुरू केले. बदलत्या काळानसुार औद्यागिक रसायनशास्त्र, संगणकशास्त्र या कोर्सबरोबरच विविध विषयात संशोधन केंद्र सुरू केले. १९८४ ला तांत्रिक शिक्षणाची सोय केली. १९८८ ला डी.एड.,बी.एड. सुरू केले. तत्कालीन मुख्यमंत्री मा. शंकररावजी चव्हाण यांच्या आवाहनानुसार विद्यार्थी आंदोलनाला प्रतिसाद देत बी.एड. शुल्क परत करणारे महाराष्ट्रातील एकमेव महाविद्यालय होय, याचा आम्हाला अभिमान वाटतो. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.



## शिक्षणरत्न शिवाजीराव मोरे (दाजी)

अध्यक्ष, भारत शिक्षण संस्था उमरगा

कार्यकाल : २१/१०/२००२ ते ०४/११/२०१६

"२४ नोव्हेंबर २००२ नंतर भारत शिक्षण संस्थेची धुरा स्व. शिवाजीराव मोरे (दाजी) यांनी समर्थपणे पुढे नेली. नॅकला सामोरे जाण्यास श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या परिसरात इमारतींना दिलेले देखणं रूप, प्रशासनात सुसुत्रता यावी म्हणून केलेली स्वतंत्र प्रशासकीय इमारतीची उभारणी, डॉ. विजय भाटकर यांनी बसवलेले डिजीटल कॉलेज सॉफ्टवेअर प्रणाली, इंटरकॉम नेटवर्क प्रणाली, संशोधनासाठी जपानहून मागवलेले मशीन, सर्वेक्षणासाठी स्वतंत्र मोबाईल रिसर्च बस आदी प्रणाली दाजींनी उपलब्ध करून दिल्या. शिक्षणाचे आधुनिकीकरण करण्याचा त्यांचा दृष्टीकोन होता. त्याचबरोबर बहुजन समाज गोरगरीब, शेतकरी, शेतमजुरांच्या मुलींना उच्च शिक्षणाची गैरसोय होवू नये म्हणून स्वतंत्र मुलीचं वसतीगृह उभारले. इंग्रजी विषयात एम.ए. कोर्सची सोय केली. २१ व्या शतकातील बदलत्या आव्हानांचा स्विकार करून महाविद्यालयाबरोबरच भारत शिक्षण संस्थेचे नाव राष्ट्रीय पातळीवर नेण्याचे कार्य दाजींनी केले. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन."



## श्री. अमोल शिवाजीराव मोरे

अध्यक्ष, भारत शिक्षण संस्था उमरगा

२१ वे शतक हे ज्ञानाचे शतक. माहिती तंत्रज्ञानाच्या या काळात बदलांचा स्विकार करून विकासाचा रथ पुढे नेण्याची जबाबदारी भारत शिक्षण संस्थेच्या पितृतुल्य सदस्यांनी श्री. अमोल शिवाजीराव मोरे यांच्यावर सोपवली. अभियांत्रिकी पदवीधर आणि इंग्लडमध्ये एम. एस. चे शिक्षण घेताना अनुभवलेल्या शिक्षण पध्दतीची अंमलबजावणी उमरगा तालुक्यातील संस्थेच्या शाखेमध्ये राबवण्याचा संकल्प आहे. पारंपारिक अभ्यासक्रमा-बरोबरच व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी त्यांनी प्रथम तात्यारावजी मोरे कॉलेज ऑफ फार्मसी या नवीन औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाची स्थापना अध्यक्षपदाच्या पहिल्याच वर्षी केली. महाविद्यालयात ८ विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम, पदवी शिक्षण घेतानाच प्रशिक्षण व रोजगार यासाठी विविध कंपन्यांशी सामंजस्य करार केले आहेत. संस्थेच्या सर्व शाखेत शिस्त, गुणवत्ता याबरोबरच विद्यार्थी केंद्रित शिक्षण देण्याचा त्यांचा कटाक्ष आहे.



# डॉ.एच.एन.रेडे

प्राचार्य



संपादक मंडळ



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एच.एन.रेडे प्राध्यापकांसमवेत



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एच.एन.रेडे शिक्षकेत्तर कर्मचा-यांसमवेत




सोलार एनर्जी प्लँन्टची पाहणी करताना




एन.एस.एस.शिबीराचे उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना
जिल्हा समान्वयक प्रा.सुर्यकांत आगलावे




भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमीत्त
मार्गदर्शन करताना ॲड.राजेंद्र लातूरकर



भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमीत्त
मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.एच.एन.रेडे




एन.एस.एस.शिबीराचे उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना
जिल्हा समान्वयक प्रा.सुर्यकांत आगलावे



पोलिओ डोस देताना एन.एस.एस.कार्यक्रम अधिकारी
प्रा.डॉ.किरण लोमटे





महाविद्यालयाचे प्रसिध्द कुस्ती पटू श्री. प्रविण पाटील
विद्यपीठ कुस्ती मध्ये सर्व प्रथम व महाराष्ट्र केसरी मध्ये रजत पदक
प्रथम विजेता. व्यासपीठावर महाबली सतपाल, महाराष्ट्राचे
मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, खा.उदयनराजे भोसले व इतर मान्यवर.

माकणी येथे आयोजित खुल्या मॅरेथॉन स्पर्धेत महाविद्यालयाचा
स्टार खेळाडू श्री.अखिल जाधव हा सर्व प्रथम आल्याबद्दल
प्रमाणपत्र व बक्षीस वाटप करतांना गावातील
सरपंच श्री.विठ्ठल साठे व इतर मान्यवर.





पनवेल येथील सातवी महाराष्ट्र राज्य कुस्ती स्पर्धेत
कु.पायल बनसोडे सुवर्ण पदक विजेमी

महाविद्यालयाची ज्युदो पट्टू कु.रागीणी शेरखाने
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ स्पर्धेत सर्व व्दितीय







अंतर-महाविद्यालयीन विद्यापीठ क्रॉस कंन्ट्री स्पर्धेत अखिल जाधव
डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करताना

कन्नड येथील आयोजित महाविद्यालयीन क्रॉस कंन्ट्री स्पर्धेत
महाविद्यालयाचा खेळाडू श्री.अखिल जाधव



अखिल भारतीय खेलो इंडिया तिसरी कुस्ती स्पर्धेत सुवर्ण पदक विजेती कु.लक्ष्मी पवार हिचा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.येवले सर यांच्या हस्ते प्रमाणपत्र स्विकारताना.



अखिल भारतीय खेलो इंडिया तिसरी कुस्ती स्पर्धेत सुवर्ण पदक विजेती कु.लक्ष्मी पवार व महाविद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख डॉ.अनिल पाटील व इतर मान्यवर




विद्यापीठ खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राची पहिली व एकमेव सुवर्ण पदक विजेती
**कु.लक्ष्मी सिताराम पवार**



महाविद्यालयाचा क्रॉस कंन्ट्री खेळाडू श्री अखिल जाधव यांचा सत्कार करतांना प्राचार्य डॉ.एच.एन.रेडे सर



रांगोळी स्पर्धेत सहभाग विद्यार्थीनी कु.बिराजदार



महाराष्ट्र वरिष्ठ कुस्ती स्पर्धेत श्री अनुदान चव्हाण तृतीय
आल्याबद्दल मा.ना.श्री.अजितदादा पवार यांच्या हस्ते सत्कार.



महाराष्ट्र केसरी स्पर्धेत सर्व तृतीय आलेला
महाविद्यालयाचा कुस्ती पटू श्री. प्रविण पाटील



महाराष्ट्र वरिष्ठ कुस्ती स्पर्धेत सर्व तृतीय आलेली
कु.लक्ष्मी पवार प्रमाण पत्र स्विकारताना.



महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत तृतीय आलेला
श्री.प्रविण बाजीराव पाटील

# भारत शिक्षण संस्थेचे
# बी.एस.एस.कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, माकणी
## वार्षिक अहवाल
(२०२१-२२)

स्वातंत्र्यपूर्वकाळात सन १९४१ मध्ये स्थापन झालेल्या भारत शिक्षण संस्थेचे अगदी अलीकडील काळात वीस वर्षापूर्वी सुरू झालेले हे महाविद्यालय आहे या महाविद्यालयाची स्थापना १९९९ या शैक्षणिक वर्षाच्यासुरूवातीस झाली. या वर्षी महाविद्यालय २३ व्या वर्षात पदार्पण करत आहे. अगदी कमी कालावधीत यशाचे शिखर गाठणारे महाविद्यालय संस्थाचालकांच्या दुरदृष्टीपणामुळे निरंतर विकासाच्या दिशेने वाटचाल करत आहे.

माकणी व माकणी परिसरातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी या महाविद्यालयाने उपलब्ध करून दिली आहे. येथील विद्यार्थी शहरी विद्यार्थ्यांच्या तुलनेत तसुभरही कमी पडणार नाही. यासाठी महाविद्यालय व संस्था सातत्याने प्रयत्नशील आहे. सुरूवातीचे चार-पाच वर्ष केवळ कला शाखेतून शिक्षण दिले जात होते. येथील बारावी विज्ञान व वाणिज्य शाखेतून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेऊन संस्थेने शैक्षणिक वर्ष २००५-२००६ मध्ये विज्ञान शाख सुरू केली . शैक्षणिक २०१०-२०११ मध्ये वाणिज्य शाखेची सुरूवात केली. विद्यार्थ्यांना आवश्यक असलेली पाठय पुस्तके व संदर्भ ग्रंथ पुरविण्यासाठी महाविद्यालय सातत्याने प्रयत्नशील आहे. वरचेवर आमचे ग्रंथालय समृद्ध होत आहे ग्रंथालय साद्यस्थिती ७२८० ग्रंथ उपलब्ध आहेत तसेच मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतील नियतकालिके, वर्तमानपत्रे नियमितपणे विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत.

**राष्ट्रीय सेवा योजना**

श्रमसंस्कार व श्रम प्रतिष्ठा व त्यातून श्रेष्ठ जीवन मुल्यांकडे वाटचाल करण्याची वृत्ती तरूणांमध्ये निर्माण होईल विद्यार्थ्यांच्या अंगी शिस्त, देशप्रेम, सामाजिक बांधिलकीची भावना रूजावी म्हणून एनएसएस चे तीन युनिट महाविद्यालयांमध्ये कार्यरत आहे. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना मध्ये ३०० विद्यार्थी प्रवेशित आहेत. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना मध्ये एनएसएसच्या विशेष युवक शिबिरासाठी एकूण १५० विद्यार्थी संख्येस डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने मान्यता दिली आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी म्हणून प्रा.डॉ.एस.ई मुंडे प्रा.के.ए.लोमटे प्रा.आर.यु.चोचंडे हे कार्यरत आहेत. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांच्या माध्यमातून साथीच्या रोगाच्या संदर्भात जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन, सांस्कृतिक, मनोरंजनात्मक कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून ग्रामस्वच्छता, अंधश्रध्दा निर्मूलन, मॅरेथॉन व वक्तृत्व स्पर्धा, विद्यापीठ वर्धापन दिन, सद्भावना दिन शिक्षक दिन फिट इंडिया हिट इंडिया, सदृढ भारत सशक्त भारत आदी कार्यक्रमाचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधण्याचा प्रयत्न महत्त्वाची कार्य यशस्वीपणे करण्यात आला.

**प्राध्यापक**

महाविद्यालयातील अनुदानित कला व विज्ञान शाखेतील एकूण एकवीस पूर्णवेळ प्राध्यापक कार्यरत आहेत व वाणिज्य शाखेत दोन प्राध्यापक विनाअनुदानित तत्त्वावर कार्यरत आहेत तसेच तासिका तत्वावर सात प्राध्यापक कार्यरत आहेत महाविद्यालयातील बहुतांशी प्राध्यापक नेट-सेट उत्तीर्ण व पीएचडी प्राप्त केलेले आहेत. त्याच बरोबर प्राध्यापक पी.एम.मोरे प्रा.के.ए.लोमटे प्रा.श्रीमती आर. यु.चोचंडे यांचे संशोधन कार्य सुरू आहे. महाविद्यालयातील प्राध्यपकांनी आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर चर्चासत्रात संशोधन पेपर सादर केले आहेत.

**शिष्यवृत्ती**

महाविद्यालयात प्रवेश घेणा-या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना आर्थिक अडचणीचा सामना करावा लागू नये म्हणून शासनाच्या वतीने दिल्या जाणा-या विविध शिष्यवृत्त्या राष्ट्रीय गुणवत्ता, शिष्यवृत्ती, मागासवर्गीय मुला-मुलींना मिळणारी भारत सरकार शिष्यवृत्ती, अपंग शिष्यवृत्ती एकूण ३८६ विद्यार्थ्यांना महाविद्यालयाने शिष्यवृत्त्या मिळवून दिल्या आहेत.

**वार्षिक परिक्षेचा निकाल**

प्रतिवर्षाप्रमाणे मार्च एप्रिल २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या परीक्षेत महाविद्यालयातील ८५ टक्के पेक्षा जास्त विद्यार्थी उत्तीर्ण असून महाविद्यालयाने उज्वल यशाची परंपरा चालू ठेवली आहे.

**विविध सांस्कृतिक कार्यक्रम**

सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले छत्रपती शिवाजी महाराज जयंती, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, मराठवाडा मुक्तीसंग्रामदिन, स्वातंत्र्य दिन इत्यादी विविध दिनानिमित्त महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्त्वाचा विकास करण्याचा आणि कलागुणांना वाव देण्याचा प्रयत्न महाविद्यालयाने यशस्वीपणे केला. वरील सर्व कार्यक्रम ऑनलाईन आणि ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आले. शासनाच्या मार्गदर्शक सुचनाचे पालक करून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र**

प्रा.पी.एम.मोरे यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र चालविले जाते.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रशासकीय व इतर स्पर्धात्मक परीक्षेच्या माध्यमातून नोकरीची संधी प्राप्त व्हावी यासाठी विद्यार्थ्यांची बौद्धिक व मानसिक स्तरावर तयारी करून घेण्यासाठी महाविद्यालयात स्पर्धा परीक्ष मार्गदर्शन केंद्र यशस्वीपणे चालविण्यात येत आहे. या केंद्रामार्फत विविध स्पर्धा परीक्षेची पुस्तके मासिके विद्यार्थ्यांना प्राप्त करून दिले जातात. विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी प्राप्त करून देण्याचे या केंद्राचे कार्य यशस्वीपणे चालू आहे. दिले जातात. विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी प्राप्त करून देण्याचे या केंद्राचे कार्य यशस्वीपणे चालू आहे.

**अस्मिता वार्षिक अंक**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला व सृजनशीलतेला वाव मिळवून देण्यासाठी स्वतंत्र व्यासपीठाची आवश्यकता होती. म्हणून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची प्रतिभा शब्दांकित करण्याच्या प्राजळ हेतूने महाविद्यालयाने 'अस्मिता' हा वार्षिक अंक प्रकाशित करण्याचे सुनिश्चित केले. विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या कथा लेखन, कविता, चारोळया, वैचारिक लेखन इ.तसेच महाविद्यालयाच्या विविध विभागाचे अहवाल, महाविद्यालयांची प्रवेश प्रक्रिया, फीस, शिष्यवृत्ती योजना इत्यादीची माहिती परिसरातील नागरिकांना व नव्याने प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना करून देण्यासाठी महाविद्यालय दरवर्षी 'अस्मिता' वार्षिक अंक प्रकाशित करीत आहे.

**अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC)**

महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन करून घेण्यासाठी व महाविद्यालयाचा गुणात्मक दर्जा वाढविण्यासाठी महाविद्यालयात गुणवत्ता हमी कक्ष कार्यरत आहे. हा विभाग प्रा.डॉ.एस.ई.मुंडे यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत आहे. महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थी यांच्यात संशोधन कार्याची आवड निर्माण व्हावी जास्तीत जास्त प्राध्यापक विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात सहभागी होण्यासाठी व संशोधन पेपर सादर करण्यासाठी (आय.क्यू.ए.सी.) विभागाकडून प्रोत्साहन दिले जाते. महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन करून घेण्यासाठी शैक्षणिक व संशोधनाचा गुणात्मक दर्जा वाढविण्यासाठी हा विभाग सातत्याने कार्य करत आहे.

**महिला सबलीकरण कक्ष (Women Empowerment Cell)**

महाविद्यालयांमध्ये मुलींची संख्यात्मक व गुणात्मक वाढ होण्यासाठी तसेच पुरूषांबरोबर इतर क्षेत्रात समान संधी उपलब्ध व्हावी हा उद्देश ठेवून महाविद्यालयांमध्ये महिला सबलीकरण कक्षाच्या माध्यमातून विविध उपक्रमाच्या माध्यमातून प्रोत्साहन दिले जाते प्रा.आर.यू.चोचंडे या कक्षाचे काम पाहतात.महाविद्यालयात परिसर जागृती अभियान, जागतिक महिला दिन,सावित्रीबाई फुले जयंती साजरी केली जाते. लघु उद्योगाचे प्रशिक्षण दिले जाते. महाविद्यालयात विद्यार्थिनींचे आरोग्य तपासणी व हिमोग्लोबिन तपासणे प्राथमिक आरोग्य केंद्र माकणी यांच्या सौजन्याने करण्यात येते. जागर जाणीव अभियान विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात आले आहे.

**क्रीडा विभाग**

मानवी जीवनात खेळास अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त झालेले आहे. मानवाचा सर्वांगीण विकास होण्यास खेळ या घटकांचा सर्वात वरचा क्रमांक लागतो. मनुष्याला रोगापासून दूर राहण्यासाठी व निरोगी शरीर आण्यासाठी खेळ आवश्यक असतो. एका निरोगी शरीरात निरोगी मन असते असे म्हटले जाते. सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी व गरीब कुटुंबातील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांची शिक्षणाची सोय करण्याची एकमेव उद्दात हेतू ठेवून भारत शिक्षण संस्थेची स्थापना १९४१ आली उमरगा या ठिकाणी करण्यात आली. आमच्या महाविद्यालया

विषयी व संसथेविषशी माहिती सांगणे हे माझे कर्तव्य समजतो. उमरगा या ठिकाणी १९५९ साली श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालय सुरू करण्यात आले तसेच १९९९ मध्ये माकणी या छोट्शा ग्रामीण भागात शिक्षण संस्थेचे कला महाविद्यालय सुरूवात करण्यात आले, हा परिसर भूकंपग्रस्त असल्याकारणाने या परिसरातील विद्यार्थी व विद्यार्थिनीचा स्वतःच्या व स्वतःच्या कुटूंबाचा व त्या अनुशंगाने समाजाचा एक चोफेर विकास व्हावा या उद्देशाने कॉलेजची मुहूर्तमेढ रोवली.

सण २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात विद्यापीठाचे शैक्षणिक शुल्क ६०० रू. भरून महाविद्यालयातर्फे आम्ही कुस्ती, क्रिकेट, बॉक्सिंग, कबड्डी, मैदानी स्पर्धा, तायक्वांदो या क्रिडा प्रकारात प्रवेशिका पाठवून ऑही आंतर - महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धे भाग घेण्याची नोंदणी करून घेतली डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व वैदयनाथ कॉलेज परळी या ठिकाणी अंतर महाविद्यालय ज्युदो (मुले-मुली) स्पर्धा दिनांक १३.१२.२०२१ रोजी पार पडलेल्या या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील दोन मुली व तीन मुले यांचा सहभाग होता अत्यंत उत्कृष्ट स्पर्धेचे आयोजन या ठिकाणी करण्यात आले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व भारत शिक्ष्ज्ञण महाविद्यालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरमहाविद्यालयीन कुस्ती स्पर्धा दि.११.१२.२०२१ ते १२.१२.२०२२ रोजी पारपडलेल्या या स्पर्धेमध्ये विद्यापीठात, महाराष्ट्रात व भारतात उच्चांक निर्माण केलेली महिला पैलवान कुमारी लक्ष्मी पवार आंतरविद्यापीठ स्पर्धेत ६२ कि.ग्रॅ.या वजन गटात सुवर्णपदकाची मानकरी ठरलेली महाविद्यालयाची पर्यायाने महाराष्ट्राची व भारताची सुवर्णकन्या लक्ष्मी पवार यांचा सहभाग या ठिकाणी आवर्जून उल्लेख करावा लागेल. आमच्या महाविद्यालयाचे कुस्ती क्षेत्रातील वर्चस्व सर्व ज्ञात असेच आहे.
राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पहिलवान आमच्या महाविद्यालयात शिक्षण घेत असतात. जालना येथील प्रचंड प्रेक्षकांची उपसिथतीत या स्पर्धा पार पडल्या महाविद्यालयातील प्रवीण पाटील ८४ कि.ग्रॅ.वजन गटात रजत पदाचा मानकरी ठरला. या स्पर्धेवर कोरोना महामारी चा सावट गेली दोन वर्षे खेळ प्रकारात प्रकर्षाने जाणवले महाविद्यालयातील काही खेळाडूंना याच कारणामुळे स्पर्धेत भाग घेता आला नाही.
डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंबेउकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथे अंतर-विद्यापीठाच्या मैदानीस्पर्धेची निवड करण्यात आली. क्रीडा विभागाच्या भव्य अशा मैदानावर स्पर्धा घेण्यात आल्या यामध्ये महाविद्यालयातील सुप्रसिध्द धावपटू श्री अखिल जाधव व कोरडे अनिकेत यांचा समावेश होता चारशे मीटर व दीड हजार मीटर या रनिंग प्रकारांमध्ये अगदी शेवटच्या चुरशीच्या अशा स्पर्धेत आखील जाधव यांच्या छोटयाशा चुकीमुळे रजत पदकावर समाधान मानावे लागले. महाविद्यालयाचा दुसरा धवपटू कोरडे अनिकेत याचाही ५ कि.मी व १० कि.मी. रनिंग प्रकारामध्ये निसटता पराभव झाला.

महाविद्यालयाची खेलो इंडिया सुवर्ण कन्या कु.लक्ष्मी पवार ही या शैक्षणिक वर्षात पाठीच्या आजाराने ग्रस्त असल्याकारणाने महाराष्ट्र राज्य सीनियर महिला कुसती मध्ये कांस्य पदकापर्यंत मजक मारू शकली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कन्नड यांच्या संयुक्त विद्यमाने अंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धा आयोतिज करण्यात आल्या. आमच्या महाविद्यालयाचा एक अनमोल हीरा अखिल अविनाश जाधव आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर अखिल भारतीय अंतर-विद्यापीठ क्रॉस-कंट्री स्पर्धेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाच्या संघात आपले सथान पक्के केले.

सतारा येथे पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य ग्रीको रोमन कुश्ती स्पर्धेत महाविद्यालयाचा स्टार पहलवान अनुदान चौहान ७४ क.ग्रॅ वजन गटात कांस्य पदकाचा मानकरी ठरला.

७ व्या स्टूडेंट ओलंपिक राष्ट्रीय स्पर्धा रोहतक (हरियाणा) येथे आयोतिज करण्यात आल्या. या स्पर्धेत महाविद्यालयातील, ३ मुली व ४ मूले यानी स्वर्ण पदकाची कमाई करून महाविद्यालयाचा दबदबा कायम ठेवत महाविद्यालयाच्या नावास साजेशी अशी कामगिरी करूण सर्वांचे लक्ष्यवेधुन घेतले.

**सुवर्ण पदक विजेते खेळाडू खालील प्रमाणे :**

१. बनसोडे पूजा दयानंद - ५५ कि.ग्रॅ. कुस्ती
२. घडगे ऋषिकेश सुभाष - ६५ कि.ग्रॅ. कुस्ती
३. ऐरंडे आकाश केरनाथ - ७१ कि.ग्रॅ. कुस्ती
४. बनसोडे पायल दयानंद - ५० कि.ग्रॅ. कुस्ती
५. बनसोडे सदानंद दयानंद - ५६ कि.ग्रॅ. तायकांदो
६. भुजबळ पवन वैंकट - ७४ कि.ग्रॅ. कुस्ती
७. कु. पवार लक्ष्मी - ६२ कि.ग्रॅ. कुस्ती

उस्मानाबाद जिल्हा एथलेटिक्स असोसिएशन तेँ आयोजित महाराष्ट्र एथलेटिक्स निवडचाचणी पार पडली. महाविद्यालयाचा अखिल जाधव ढावपट्टूने ५०० मीटर व १५०० मीटर स्पर्धेत जिल्हयातुन सर्वप्रथम येऊन आपली निवड पुणे येथे होणा-या महाराष्अ्र राज्य खुले एथलेटिक्स स्पर्धेत आपली निवड सार्थक ठरवून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

आमच्या महाविद्यालयातील क्रीडा विभाग प्रारंभी अतिशय प्रभावी असे कार्य करत आहे. आजपावेतो अनेक वेळा अनेक ठिकाणी आमच्या महाविद्यालयातील खेळाडूंनी उत्कृष्ट आशी कामगिरी नेहमी बजावलेली आहे. क्रीडा क्षेत्रातील या वाटचालीच्या यशात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एच.एन.रेडे तसेच महाविद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख प्रा.डॉ.अनिल पाटिल यांचे कुशल नेतृत्व व भारत शिक्षण संस्थेने खेळाडुंना शक्य तेवडे सहाय्य करण्याच्या परंपरेने महाविद्यालयातिल खेळाडू नक्कीच आकाश भरारी घेतीलच यात शंका नाही.

या गौरवशाली यशात क्रीडा समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एच.एन.रेडे, समितितील सदस्य प्रा.डॉ.मुंढे, प्रा.डॉ.चोचंडे, प्रा.डॉ.सुरवसे, प्रा.डॉ.सुरवसे, प्रा.डॉ.बीराजदार, प्रा.गावित यांचे सततचे परिश्रम व तसेच क्रीडांगणावर खेळाडुंना गैरसोय न जानवू देनारे श्री.नासाळे बालाजी आणि महाविद्यालयाच्या नावाला सर्वार्थाने सार्थ करण्यासाठी झटनारे सर्व खेळाडू यांचा सिंहासा वाटा आहे.

# विभाग

## मराठी विभाग

मराठी भाषा साहित्य समाज आणि संस्कृती यांचा अनन्यसाधारण असा संबंध आहे. मराठी विभागाच्या वतीने साहित्य संस्कृती आणि समाज यांचे नाते दृढमूल करण्याचे कार्य महाविद्यालयाच्या स्थापनेपासून अविरतपणे चालू आहे. मराठी विभाग महाविद्यालयाच्या स्थापनेपासूनच कार्यरत आहे. विद्यापीठाने ठरवून दिलेल्या अभ्यासक्रमानूसार भाषा, साहित्य, साहित्य समीक्षा, कथा, कादंबरी, नाटक, काव्य आणि व्याकरण यांचे अध्यापण केले जाते. मराठी ही मातृभाषा असल्यामुळे मराठी भाषेचा दैनंदिनी जीवनात सातत्याने वापर होत असतो. भाषा व्यवहारातील बारकावे विद्यार्थ्यांना समजावून दिले जातात. त्याच बरोबर विद्यार्थ्यांना मराठी भाषा साहित्य संस्कृती संदर्भात आवड निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जातात.

अभ्यासक्रमांमध्ये विविध साहित्य प्रकारातील प्रसिध्द साहित्यिकांचे साहित्य तसेच मराठी भाषेतील मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्य आत्मसात करता यावे म्हणून प्रयत्न केले जाते. मराठी भाषेचे व्याकरण विद्यार्थ्यांना आत्मसात करता यावे म्हणून विशेष प्रयत्न केले जातात. वेगवेगळया प्रकारच्या पत्र लेखन कौशल्य, अर्ज लिखाणाची कौशल्य त्यांना अवगत व्हावे म्हणून विशेष प्रयत्न केले जातात. त्याच बरोबर मराठी विषयाच्या तज्ञ प्राध्यपकांचे अतिथी व्याख्यानेही आयोजित केले जाते. आणि विद्यार्थ्यांच्या अंगी सभादिष्टपणा यावा म्हणून सेमिनार आणि गटचर्चा आयोजित केली जाते. त्याबरोबर समाजातील वेगवेगळया प्रश्नांच्या अनुषंगाने गटचर्चा आयोजित करून विद्यार्थ्यांना वर्तमान प्रश्नांची जाणीव व्हावी म्हणून गट चर्चेचे आयोजन केले जाते. त्याच बरोबर विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढीस लागावा आणि त्यांना विषयाचे नीट आकलन व्हावे म्हणून मराठी विभाग सातत्याने प्रयत्नशिल आहे.

वाङ्:मय मंडळाच्या माध्यमातून राबविल्या जाणा-या ‘शब्दगंध’ या भिती पत्रिका व अस्मिता वार्षिक अंक यासाठी लेखन विद्यार्थ्यांकडून करून घेतले जाते. त्याव्दारे विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला प्रेरणा देण्याचा प्रयत्न केला जातो. विद्यार्थ्यांना वक्तृत्व व वाद विवाद स्पर्धा करिता विशेष मार्गदर्शन केले जाते. आयसीटी उपक्रमांच्या वापरामुळे अध्यापन प्रक्रिया सुलभ होते. पदवी प्राप्त करणा-या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर वर्गात प्रवेश घेण्याकरिता तसेच स्पर्धा परीक्षा देण्याकरिता प्रोत्साहन देण्यात येते. मराठी भाषेच्या ज्ञानामुळे भविष्यात माध्यमांसाठी लेखन कौशल्य, व्याकरण कौशल्य, साहित्य लेखनाची प्रेरणा विद्यार्थी आत्मसात करतात. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाच्या विकासाच्या दृष्टीने प्रयत्न केले जातात. कवी लेखक, समीक्षक आणि संशोधक घडविण्याचे कार्य मराठी विभागाच्या माध्यमातून सातत्याने होत आहे. त्यामुळे विविध क्षेत्रात विद्यार्थ्यांना संधी मिळू शकते. शिक्षण, उद्योग, व्यवसाय आणि विविध कंपन्यांमध्ये आमचे विद्यार्थी सेवेत कार्यरत आहेत.

## हिंदी विभाग

हमारे इस महाविद्यालय की सन १९९९ मे स्थापना हुई तब से अबतक इस महाविद्यालय की, उतरोत्तर प्रगती हुई है। इस महाविद्यालयसे हर वर्ष तक रोषण ११०० से भी ज्यादा छात्र एवं छात्राए बी.ए.बी.एस्सी.बी. कॉम. बी.व्हाक जैसे अत्याधुनिक पाठयक्रमोका समावेश है। इतनाही नही तो इस महाविद्यालय मे एम.पी.एस.सी.विभाग भी कार्यरत है।

हिंदी विभाग हमारे हिंदी विभागमे तीनों विद्या शाखाँए जैसे की कला शाखा विज्ञान शाखा एवं वाणिज्य शाखा मे हिंदी विषय ऐच्छिक व व्दितीय भाष के रूप में अध्यायन अध्यापन के लिए है। हिंदी विभाग में कई महत्त्वपुर्ण गतिविधीया चलाए जाते है। जैसे १४ सितंबरको हिंदी दिवस समारोह का आयोजन किया जाता है। हिंदी विभाग के अंतर्गत काव्य प्रतियोगीता , निबंध प्रतियोगीता, शुद्धप्रतियोगीता आदी का आयोजन कीया जाता है। हमारे हिंदी विभाग के मेधावी छात्र छात्राए इस प्रतियोगीतामें हिसा लेते हुए हिंदी विभाग एव विषय की गरीमाको बनाये रखनेमे मे बकुबी हअहम भुमीका रखते है।

## इंग्रजी विभाग

महाविद्यालयाच्या स्थापनेपासूनच इंग्रजी विभाग कार्यरत आहे. विद्यापीठाने ठरवून दिलेल्या अभ्यासक्रमानूसार इंग्रजी भाष, साहित्य तथा साहित्य समीक्षा यांचे अध्यापन केले जाते. इंग्रजी ही वैश्विक भाषा असल्याने इंग्रजीचा दैनंदिन जीवनात होणारा वापर ते आंतरराष्ट्रीय पातळीवरील इंग्रजीचे महत्त्व विद्यार्थ्यांना विशद केले जाते. अभ्यासक्रमामध्ये विविध साहित्य प्रकारातील जगविख्यात साहित्यकांचे साहित्य तसेच इंग्रजी भाषेतील भारतीय साहित्यिकांचे लिखाण, इंग्रजी भाषेचे बोली स्वरूप आणि व्याकरण यांचा समावेश असल्यामुळे विद्यार्थी ज्ञानसंपन्न होतो. इंग्रजीचा उच्चार, व्याकरण याकडे लक्ष दिले जाते. तज्ञ प्राध्यापकांचे व्याख्यान (गेस्ट लेक्चर) आयोजित केले जातात. सेमिनार व गटचर्चा या द्वारे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढीस लागून त्योच विषयाचे आकलन समजण्यास मदत होते. वाङःमय मंडळ (लिटररी असोसिएशन) च्या माध्यमातून राबविल्या जाणा-या 'शब्दगंध' भित्तीपत्रिका व 'अस्मिता' वार्षिक अंक यासाठी लेखन इत्यादी व्दारे विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला प्रेरणा देण्याचा प्रयत्न होता. विद्यार्थ्यांना वक्तृत्व व वाद-विवाद स्पर्धा करिता मार्गदर्शन केले जाते. आय.सी.टी. उपकरणांच्या वापरामुळे अध्यापन प्रक्रिया सुलभ होते. पदवी प्राप्त करणा-या विद्यार्थ्यानां पदव्युत्तर वर्गात प्रवेश घेण्याकरिता तसेच स्पर्धा परीक्षा देण्याकरिता प्रेरित केले जाते. पदवी वर्गाच्या अभ्यासक्रमाच्या दरम्यान इंग्रजी भाषेच्या ज्ञानामुळे भविष्यात शिक्षण, मुद्रण तथा आदरातिथ्य क्षेत्र, पर्यटन, तांत्रिक लेखन, साहित्य लेखन इत्यादी क्षेत्रात उपलब्ध होऊ शकणा-या संधीबाबत माहिती दिली जाते. त्यामुळेच महाविद्यालयातून शिक्षण घेतलेले विद्यार्थी शिक्षण, प्रशासन, उद्योग व व्यवसाय तसेच बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये कार्यरत आहेत.

## इतिहास विभाग

इ.स.१९९९ साली महाविद्यालयाच्या स्थापने बरोबर इतिहास विभाग कार्यरत आहे. इतिहास विषयाच्या अभ्यासाने व्यक्ती व समाजाला योग्य दिशा व मार्गदर्शन मिळते. मानवी जीवन संस्कारक्षम बनविण्यासाठी इतिहासाचाअभ्यास उपयुक्त ठरतो. देशाचा जबाबदार नागरीक बनण्यासाठी थोर महापुरूषांची चरित्रे त्यांचे कार्यकर्तृत्व आपल्याला उपकार ठरतात.

इतिहास विषय अभ्यासल्याने माणसामध्ये जिज्ञासा निर्माण होते.राष्ट्रवाढीच्या वृध्दीस व राष्ट्रीय एकात्मतेस इतिहासाचा अभ्यासा महत्वपुर्ण ठरतो. त्याचबरोबर विविध स्पर्धा परिक्षा उदा. एम.पी.एस.सी.,यु.पी.एस.सी., तलाठी,बँकींग, रेल्वे बोर्ड इ.मध्ये इतिहास हा विषय महत्वपुर्ण आहे. आज संपूर्ण देशभर पर्यटनास खुप महत्व आले आहे. त्याकरीता अनेक ऐतिहासिक पर्यटन स्थळा विषयी पर्यटकांना मार्गदर्शन करण्यासाठी इतिहासाचा अभ्यास उपयुक्त ठरतो.

आपल्या महाविद्यालयातील इतिहस विभागामार्फत विविध ऐतिहासिक स्थळास भेटी देणे, त्या स्थळांचे सर्वेक्षण करणे सहली आयोजित करणे असे विविध कार्यक्रम आयोजीत केले जातात.

## समाजशास्त्र विभाग

भारत शिक्षण संस्थेचे कला महाविद्यालयाची स्थापना मौजे माकणी येथे १९९९ मध्ये करण्यात आली. त्यामुळे समाजशास्त्र विषयाची सुरूवात १९९९ मध्ये झाली आहे. ग्रामीण परिसरातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची सोय व्हावी या उदात हेतूने हे महाविद्यालय कार्य करत आहे.

भुकंपग्रस्त भागातील लोकांचे सामाजिक जीवन, सामाजिक संबंध, सामाजिक व्यवहार, सामाजिक क्रीया, कुटुंब व्यवस्था, विवाह संस्था, सामाजिक समस्या याचा परिचय व्हावा या उद्देशाने येथील विद्यार्थ्यांना समाजशास्त्र विषयाच्या अध्ययन व अध्यापनासाठी पदवी स्तरावर हा विषय शिकविण्यात येतो.

समाजशास्त्र विषयाच्या माध्यमातून ज्या समाजात आपण राहतो त्या साजाची संस्कृती, धर्म, कल्पना, रूढी, प्रथा - परंपरा याच्या अभ्यासाबरोबरच अनुभविक ज्ञानाची सागड घालून विद्यार्थ्यांना भावी जीवनाची तयारी करण्याच्या उद्देशाने प्रयत्न केले जात आहे. समाजशास्त्र हा विषय समाजाशी संबंधीत आहे. म्हणजे प्रत्यक्ष मानवासी संबंधीत असल्यामुळे शिक्षण आणि जीवन या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याची जाणीव समाजशास्त्रामुळे होते. त्याच बरोबर विविध परिक्षेच्या माध्यमातून विदयार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध होतात. समाजशास्त्र विषयाचे महत्व वाढत आहे.

## राज्यशास्त्र विभाग

भारत शिक्षण संस्थेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय माकणी. महाविद्यालयाच्या स्थापनेपासूनच (१९९९) राज्यशास्त्र विभागाची स्थापना करण्यात आली. राज्यशास्त्र विभागाच्या वतीने विविध राष्ट्रीय सण-उत्सव दरवर्षी साजरे करण्यात येतात. स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, मराठाडामुक्ती दिन, महाराष्ट्र दिन असे विविध दिवस विभागाकडून साजरे केले जातात. त्याबरोबरच लोकशाही दिन, जागतिक मानवी हक्क दिन, मतदार जागृती दिन, संविधान दिन असे विविध राष्ट्रीय एकता आणि अखेडता जोपासणारे दिवस राज्यशास्त्र विभागाच्या वतीने साजरे केली जातात.

भारतातील विविध जाती, धर्म, वंश, प्रदेश, भाषा अशा वैविध्यपूर्ण संस्कृतीचे दर्शन विद्यार्थ्यांना व्हावे यासाठी राष्ट्रीय एकता, अखंडता जोपासण्यासाठीचे कार्यक्रम राज्यशास्त्र विभागाच्या वतीने दरवर्षी नियमितपणे घेण्यात येतात. तसेच मतदार नोंदणी अभियान, माहिती अधिकार, मानवी अधिकार यासारख्या महत्त्वाच्या लोकशाहीस पूरक असलेल्या संकल्पना संबंधी विविध कार्यक्रम विभागाच्यावतीने घेतले जातात. स्वातंत्र्या, समता, बंधुता, अधिकार, कर्तव्य, सामाजिक न्याय अशा विविध लोकशाहीस पूरक असलेल्या पूरक संकल्पना संबंधीची माहिती महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना समजावी म्हणून, महाविद्यालयाच्या स्थापनेपासून राज्यशास्त्र विभाग सातत्यपूर्ण कार्य करत आहे.

## भूगोल विभाग

माकणी हा परिसर भूकंप प्रवण क्षेत्रातील असून या परिसरात किल्लारी येथे ३० सप्टेंबर १९९३ मध्ये मोठा भूकंपाचा धक्का बसला, या भूकंपात मोठे वित्तहानी जैविक हानी व सामाजिक हानी मोठया प्रमाणावर झाली होती. माकणी येथे १९९९ मध्ये वरिष्ठ महाविद्यालय सुरू झाले तेव्हा येथील भौगोलिक प्रार्श्वभूमी लक्षात घेऊन भारत शिक्षण संस्थेच्या संचालक मंडळाने १९९९ मध्ये भूगोल विषयाचा अभ्यासक्रम सुरू केला.

भूगोलशास्त्र या विषयाच्या माध्यमातून नैसर्गिक विज्ञान जसे भूरूपशास्त्र, हवामान शास्त्र, सागरशास्त्र, जैविक भूगोल शास्त्र, पर्यावरण विज्ञान यासारख्या भौगोलिक घटकांचे आकलन व्हावे यासाठी नैसर्गिक विज्ञानाचा अभ्यास केला जातो. तसेच मानव विज्ञानाचा सुध्दा अभ्यास मानवी भूगोलशास्त्र, वस्ती भूगोलशास्त्र, लोकसंख्या, भूगोलशास्त्र, आर्थिक भूगोलशास्त्र, औदयोगिक भूगोल शास्त्र तसेच प्रादेशिक शास्त्रांचा सुध्दा अभ्यास केला जातो. जसे की महाराष्ट्राचा प्रादेशिक भूगोलशास्त्र, भारताचा प्रादेशिक भूगोलशास्त्र, कृषी भूगोलशास्त्र तसेच नैसर्गिक व सांस्कृतिक प्रात्यक्षिक भूगोल शास्त्र यासारख्या घटकांचे अध्ययन केले जाते. यातून अनेक घटकांचा उपयोग यशस्वी जीवन जगण्यासाठी उपयोगात आणला जातो व त्याचा उपयोग स्पर्धात्मक परीक्षांसाठी होतो जसे की एम.पी.एस.सी.,यू.पी.एस.सी., स्टाफ सिलेक्शन बँकींग, नेट, सेट यासाठी उपयोग होतो.

भूगोलशास्त्र विषयाच्या परिपूर्ण अभ्यास केल्यानंतर भूगोलशास्त्र विषयातील विद्यार्थी वेगवेगळया क्षेत्रातआपला व्यवसाय, नोकरी, रोजगार करू शकतो. जसे Cartographer, सर्वेयर, पर्यटन व्यवसाय, नकाशा निर्मितीकार, हवामान विश्लेषक, संरक्षक तज्ञ, माती परिक्षक, नियोजनकार इत्यादी यासारख्या असंख्य क्षेत्रात आपला रोजगार उद्योग धंदा व्यवसाय करू शकतो.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास होण्यासाठी भूगोलशास्त्र विभाग अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात. जसे भौगोलिक शैक्षणिक सहल, भौगोलिक सामाजिक आर्थिक सर्वेक्षण, भूगोलशास्त्र दिन, हवामान दिन, जलदिन यासाखे विविध भौगोलिक दिन भूगोल शास्त्र विभागातून साजरे केले जातात.

## भौतिकशास्त्र विभाग

महाविद्यालयात भौतिकशास्त्र विभाग हे विज्ञान शाखेच्या स्थापनेपासून इ.स.२००५ पासून कार्यरत आहे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना भौतिकशास्त्र विषयाची आवड निर्माण होण्यासाठी दैनंदिनतासिक अभ्यासक्रमावर आधारित वेगवेगळे प्रयोग व नवीन तंज्ञनाची म्हणजेच आय.सी.टी.ची.सांगड घालून विद्यार्थ्यांना शिकवले जाते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद अभ्यासक्रम मंडकाकडून दिलेल्या अभ्यासक्रम महाविद्यालयात शिकवला जातो. विद्यार्थ्यांना सोपे करून समजेल अशा पध्दतीने भौतिकशास्त्र विषयातील संकल्पना व्याख्या नियम इत्यादी शिकवले जातात सोप्या भाषेत त्यात मातृभाषेचा वापर केल्याने विद्यार्थ्यांना भौतिकशास्त्र विषयाची गोडी निर्माण होऊन विद्यार्थ्यांमध्ये स्वयं अध्ययन व संशोधन वृत्ती वृध्दिंगत होऊन सुक्ष्म वैज्ञानिक दृष्टिकोन तयार होतो

नवीन तंत्रज्ञानाच्या युगात आधुनिक जगात या विषयाचे अधिकाधिक महत्त्व वाढले आहे नवीन आरोग्य क्षेत्र व औद्योगिक क्षेत्रात वापरल्या जाणा-या वेगवेगळया यंत्रसामुग्री मध्ये या विषयामुळे प्रगती होत आहे. त्या दि्ष्टकोनातून विद्यार्थ्यांना सखेल मार्गदर्शन केले जाते. तज्ञ प्राध्यापकांचे व्याख्यान (Guest Lect) आयोजित केले जातात सेमिनार व गटचर्चा याव्दारे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढीस लागून त्यांना भौतिकशास्त्र विषयाचे आकलन समजण्यास मदत होते. भौतिकशास्९ा विषयातून पदवी प्राप्त विद्यार्थी पुढे पदव्युत्तर पदवी घेण्यासाठी वेगवेगळया महाविद्यरलयात प्रवेश घेतात तसेच बरेच विद्यार्थी औद्योगीक कंपन्यामध्ये वेगवेगळया पदावर कार्यरत आहेत.

## वनस्पतीशास्त्र विभाग

भारत शिक्षण संस्थेच्या श्री.छत्रपती शिवाजी महाविद्यालयात १९५९ पासून वनस्पतीशास्त्र विभाग कार्यरत आहे. विभागात सर्वच पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत.

जागतिक स्तरावरील आव्हानांचा सामना करण्यासाठी अद्यावत ज्ञान व कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये विकसीत करणे. ही दृष्टीने विद्यार्थ्यांचा शारिरीक, मानसिक व अध्यात्मिकदृष्टया विकास साधणे या कर्तव्या बुध्दीने विभागाने खालील ध्येय व उद्दिष्टे नजरेसमोर ठेवली आहेत.

**१.** उत्कृष्ठ वर्गखोल्या आणि प्रयोगशाळा व शैक्षणिक वातावरण पुरविणे.

**२.** जीवनातील कोणत्याही आव्हानांना सामोरे जाण्यासाठी उच्चिशक्षित, आत्मविश्वासाने जगणारे विद्यार्थी तयार करणे.

**३.** बदलाच्या दिशेने जाण्यासाठी ज्ञानकोश केंद्र तयार करणे.

विद्यार्थ्यांचा शैक्षणिक अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करणे, वेळप्रसंगी वैयक्तिक पातळीवर गरीब विद्यार्थ्यांना मदत करणे, स्लो लर्नर्स ला वैयक्तिक समुपदेशन करणे, विविध कार्यक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देणे, इत्यादी अत्यावश्यक बाबीपत्रवर भर दिला जातो. विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन, अतिरिक्त प्रशिक्षण, अतिरिक्त व्याख्याने, प्रतिबंधक प्रशिक्षण इ. तसेच नेतृत्व गुण विकास करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. कार्यशाळा आयोजन आणि प्रशिक्षणाच्या माध्यमातून परिसरातील शेतक-यामध्ये वनस्पतीविषयी ज्ञान विकसीत करणे विभागात शिकवण्यासाठी अभिनव पध्दतींचा वापर केला जातो ज्यामध्ये आयसीटी आधारित शिक्षण (इंटरनेट कनेक्विव्हिटी, संगणक आणि एल.सी.डी.प्रदर्शन) मोडेल्स चार्टस, समूह चर्चा इत्यादी.

**वनस्पती शास्त्र विषय घेऊन बी.एस्सी.पूर्ण केल्यास खालील क्षेत्रात संधी आहे.**

**१.** एम.पी.एस.सी. /यु.पी.एस.सी.साठी पात्रता परीक्षा.

**२.** वनस्पतीशास्त्र, पर्यावरण शास्त्र, जैवतंत्रज्ञान विषयात पदव्युत्तर वर्गात प्रवेश

**३.** मेडीकल रिप्रेसेन्टेटीव्ह (MR) म्हणून फॉर्मा कंपन्यांत नोकरी.

**४.** एम.बी.ए.झाल्यास फॉर्मा कंपन्यां मॅनेजर.

**५.** डी.एम.एल.टी. केल्यास स्वतःची पॅथोलरॅजी लॅब.

**६.** अनेक मल्टीनेशन सीड कंपन्यामध्ये नौकरी.

**७.** मोठया नर्सरी मध्ये प्लान्ट ब्रीडर म्हणून नौकरी.

## DEPT. OF ZOOLOGY

**Profile of the Department of Zoology**

The Dept.of Zoology was opened in 2005 along with the dept. of Zoology and since then only general course has been taught till today. From the academic session 2005-06 under affikiated to Dr. Babasaheb Ambedkar marathwada University, Aurangabad the Dept. started teaching at the Best level. Our Zoology Department is one of the best Department In our College.

It is matter of Pride to mention that our staff members are filly qualified Ph.D. and M.Phil. our Teaching staffs are fully engaged in Research work and different Departmental Activities.

**Name of the Depaetment :** Zoology

**Year of establishment :** Started special subject as a Zoology - 2005

***Aim and Objectives***

1) To impart basic education in Zoology.
2) To develop experimental skill of the students in the subjects.
3) To develop scientific temperament.
4) To prepare the students for admission to higher studies
5) To prepare the students for employments in small scale industries
6) To motivate the students for self employments.
7) To prepare students for civil service examination and other competitive exam

***Job oportcunities After B.S.C. Digree (Zoology) Completed students***

1) Government Fishery Department
2) Research scientist
3) Associate Research Scientist
4) High School Teacher
5) Clivical Data Manager
6) Medicy coder
7) Zoo Keeper
8) Wildlife Educator
9) Wildlife Conservationist
10) Naturalist

## DEPT. OF CHEMISTRY

In 2005 along with the establishment of science science stream, the department of chemistery has been started. Our departments in the college. Our chemistery department has in 2005 by the affilicated to the Dr. Babasaheb Ambedkar Marathwada university, Aurangabad.

We know the fact that the prosperity and progress of faculty depends on the fundamental facilities. It is a matter of pride to mention that our staff members are fully qualified Ph.D.,M. Set. Gate. Our staff members acquired not only good academic qualification, but they are also ahead in extra-curricular and social activities like Text book writing, Resource Person in National & International Conferences, Participation in Blood Donation camp, working in social welfare etc. The department is conducting number of innovative currucular and extra-curricular activities such as seminars, student's periodical-chemica, industrial / educational tours. Alumni have also developed a continuous pool and linkage with department through guest lecture series. All these programmes have added a great value to the teaching and learning programme. The students are also guided to guided to participate in different workshops, seminars and research festivals. These activities enhance scientific attitude and popularize Science in the Society.

The main objective of the Science is to serve the society and to provide solutions to Social problems. In view of this, In view of this, we have started career oriented course in instrumentations and sample analysis. Many of our alumni have secured significant positions in academic and research institutions as well as in industries and administration. Significant number of students has achieved success in Civil service examination and industrial sector also. The students have also proved the merit in extension and academic activities.

The faculty of the department is actively angaged in research activities. Faculty of department has completed one UGC Sponsored Minor research projects. Faculty of department has published 51 research papers in the journals of national and international reputes. The department has also developed MOU / linkages with different idustries, academic and research institutes.

**भारत शिक्षण संस्थेचे**

**कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,**

**माकणी ता.लोहारा जि.उस्मानाबाद**

# मराठी विभाग

*मी शब्दांची पूजा करीत नाही*
*तर माणसांची आरती गातो*
*ज्यांच्या गावात सुर्य नाही*
*त्यांचा हातात प्रकाश देतो*

**- यशवंत मनोहर**

**● वरिष्ठ विभाग ●**

: संपादक :

**प्रा. के .आर.सुरवसे**

मराठी विभाग

: विद्यार्थी संपादक :

**कसबे सुरज प्रकाश**

# स्त्री शक्ती (वैचारिक लेख)

लोकशाहीच्या वाटेने समृद्धीकडे वाटचाल करणा-या भारताची संस्कृती म्हणजे उच्च नितीमुल्ये असलेली, प्राचीन संस्कृती अशी आज जगाला आपल्या भारतीय संस्कृतीची ओळख आहे.ही गोष्ट भारतीयांसाठी अभिमानास्पद आहे. तरीही भारतीय समाज व्यवस्था अन्यायकारक आणि दोषपुर्ण आहे, हे कटू सत्य प्रत्येक भारतीयाला स्विकारावेच लागेल पूर्णपणे वर्णाधिष्ठीत समाजव्यवस्था आणि समाजातील पुरूषांचे प्राबल्य या दोन गोष्टीमुळे भारतीय समाज व्यवस्था पुर्णपणे किडली आहे.

देशाला स्वतंत्र मिळून अर्धशतक पूर्ण झाले तरीही भारतीय स्त्री ही पुरूषप्रधान संस्कृती जासेखडातून पुर्णपणे मोकळी झालेली नाही. आजदेखील ग्रामीण भागामध्ये मोठया प्रमाणावर बालविवाह होताना दिसतात अर्थातच मुलगी मुलापेक्षा १० ते १५ वर्षानी लहान असते म्हणजे तो पुरूष लवकर वृद्ध होतो आणि त्याची सेवा शेवटपर्यंत तिलाच करावी लागते हे असे का? समाजातील सर्वच बंधने स्त्रीयांनीच का पाळायची? तिने अन्याय कुठपर्यंत सहन करायचा? या घमेंडी, स्वार्थी, खोटारडे, स्वतःला उच्च समजणा-या पुरूषांना सुद्‌बुद्धी केव्हा येणार ? त्यांना स्त्रियांचा मोठेपणा स्त्रीयांचे महत्व केव्हा समजणार ? मुलगी जन्मल्याबरोबर तिच्यावर अन्यायकारक पुरूषप्रधान समाजव्यवस्था लादली जाते. तिच्या भावनांचा विचारांचा खून केला जातो. हे केव्हा थांबणार ? शहरी स्त्रियांपेक्षा ग्रामीण स्त्रींची स्थिती अत्यंत वाईट आहे.

महाराष्ट्रातील नव्हे तर देशातील एक महत्त्वाच्या समाजसुधारक म्हणून ताराबाईचे नाव घेतले जाते स्त्री पुरूषातील सर्व असमतोल दुर करून स्त्री जातीला पुरता न्याय मिळवून द्यावा असाच त्यांचा महत्त्वाचा विचार आहे ते आपल्या निबंधात पुरूषांना म्हणतात की स्त्रिया कपटी असतात असे तुम्हाला वाटते मग तुम्ही कपटयुक्त लीला पत्रे नाहीत का ? तुमच्यासारखे कपटीतर या पृथ्वीवर कोण सापडणार नाही. स्त्री तुमच्यावर प्राणाहून जास्त प्रेम करते यात शंका नाही. स्त्रीचे मन फक्त एकावरच बसते तुम्ही मात्र भ्रमासारखे या फुलावरून त्या फुलावर उडत राहता, परंतू स्त्री तशी नसते स्त्री तुमच्यावर मनापासून प्रेम करत असताना तुम्ही दुसरीवर नजर ठेवता तिसरीबरोबर स्वैराचार करता आणि मनात चौथ्या स्त्रीचे चिंतन करता तरीही स्त्री तुमच्या सारखे एकाला हात आणि दुस-याला लाथ असे करणार नाही ती सतत एकाच पुरूषासोबत राहिल मनासारखे असेल तर ठिक नसेल तरीही ती त्याच्याकडे आनंदाने नांदते परंतू तुम्ही वेळ पडली तर घुबडासारख्या कुरूप स्त्रीला देखील सोडणार नाही ती तुम्हाला रंभाच वाटेल.

कोणाला जहागिरीवरून राज्यपदावरून देखील खाली ओढायला मागेपुढे पाहात नाहीत असे असताना स्त्रीलाच कपटी कसे म्हणू शकता तुम्ही रोज जहागिरी,वतन देशमुख पाटीलकी करीता एकमेकांचे प्राण घेता विषप्रयांग करता हेही स्त्रियां मुळेच का स्वतः दोषी असताना तुम्ही स्त्रियांना प्रत्येक ठिकाणी दोषी का ठरविता.

बर ताराबाईच जाऊदे मला वाटते आजचा समाज स्त्रीकडे एक सुख देणारी वस्तु अशा घृनास्पद अर्थाने पाहतो हे पाहणे चुकहचे आहे पुरूष स्त्रीपेक्षा श्रेष्ठ आहे. असे काही सनातनी लोक म्हणतात ते म्हणतात की पुरूषच वंशाचा दिवा आहे. म्हणजे तोच वंश वाढवतो पण त्यांनी शरीरशास्त्र शिकून त्यातील सत्य स्विकारावे तर च त्यांना

समजेल की मुलगीच वंश वाढविते पुरूष प्रधान समाजव्यवस्था रूजविण्यास किंवा ती वाढविण्यास पुरूषाप्रमाणे स्त्रीयादेखील कारणीभूत आहेत. कारण त्यांना पुरूषांचे राज्यच चालू दिले नसते तर आजही स्थिती आली नसती.

आजही ग्रामीण भागामध्ये मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवले जाते आणि त्यांच्या खेळण्या-बागडणाच्या वयामध्येच त्यांना संसाराच्या गाडयाला जुंपले जाते. स्त्रियांच्या या स्थितीलादेखील काही प्रमाणात त्याच कारणीभूत आहेत. कारण वरील कारणांचा शोध घेतल्यास असे समजते की बहुतांश लग्ने ही मुलीचा वाकडा पाय पडेल व घराण्याचे नाक कापले जाईल या भितीने लवकर केली जातात म्हणून मुलीने या बाबतीत आपल्या हातून असे काही घडणार नाही याची दक्षता घ्यायला हवा ख-या प्रेमाची व्याख्या त्यांना समजायला हवी.

पौराणिक गोष्टीमध्ये सितेला आपण महापतिव्रता आहोत हे सिद्ध करावे लागले ब-याच स्त्रिया नव-याला परमेश्वर समजतात त्याची पुजा करतात त्याच्यासाठी उपवास व्रते करतात या सर्व गोष्टीबद्दल संपूर्ण समाजाला तिरस्कार वाटला पाहिजे.

स्त्रियांवरच्या अन्यायाला स्त्रीच वाचा फोडते असे म्हटले जाते पण हे काही खरे नाही कारण की असे असते तर महात्मा जोतीराव फुले. महर्षी धोंडो केशव कर्वे, गोपाळ हरी देशमुख ही नावे उदयाला आलीच नसती. शिवाजी महाराजांच्या राज्यात स्त्रीयांना सन्मान मिळालाच नसता किंवा डॉ. बाबासाहेब आंबेडकर हिंदू कोड बिला साठी झगडलेच नसते केवळ हे बिल पास झाले नाही म्हणून त्यांनी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

देशाला घातक असणारी पुरूषप्रधान संस्कृती मोडीत काढण्यासाठी पुरूषांनी आपली घमेंडी वृत्ती सोडून दयायला हवी स्त्रीयांनी या पुरूषप्रधान संस्कृती विरूद्ध एक प्रकारचे बंड उभारले पाहिजे.

पुरूषप्रधान संस्कृती स्त्रियांना घातक आहे असे म्हणने चुकीचे ठरेल ती स्त्रीयांना जेवढी घातक आहे तेवढीच पुरूषांनाही घातक ठरू शकते भारतामध्ये सध्या स्त्रीयांचे प्रमाण खुपच कमी आहे. दर १००० पुरूषांमागे ९२९ स्त्रीया आहेत म्हणजे जवळ जवळ ७ कोटी १० लाख पुरूष अविवाहीत राहण्याची शक्यता आहे किंवा बहुपतित्वाची पद्धत येऊ शकते

एकूण संपूर्ण समाजाने, शासनाने वेगवेगळया संघटनांनी पुढे येऊन पुरूषप्रधान संस्कृतीची पाळेमुळे भारतातून उखाडून टाकली पाहिजेत, तरच भारत यशाच्या वैभवशाली शिखरावर विराजमान होईल

***।। स्त्री शक्तीचा विजय असो ।।***

**राठोड अतुल**
बी.ए.व्दितीय

# प्रेमाची कथा

प्रिये तु माझ्या आयुष्यात आलीस प्रत्येक क्षणाला महत्व आलंय, श्वासा गणीस साठवलेली आठवण आणि आप्रुपाचे सारेच क्षण,जे तू माझ्या पुडयात घातलेस त्याच मोल शब्दांत मांडण्यासारख नाही ऐवढे मात्र नक्की तुझ्याविना मी अपुर्ण आहे जन्मोजन्मी साथ हवी एवढचं मागणं आहे.

तुला वजा केल्यावर बाकी काही उरत नाही. तुझ्याशिवाय आयुष्य मी आयुष्यच धरत नाही. तु गेल्यावर वाटत कसं सांगायचं होत तू खुप काही दिलं तरी आणखी मागायच होत. मुक मुक राहून तुझं नुसतच पाहत राहण जसं गोठलेल्या नदीच बर्फा खालून वाहत तुझी असणं किती छान आहे नाहीतर हे जग म्हणजेच नुसतचं माणसाच रान आहे. तुझ्यावर रागवण हा तुला आठवण्याचा बहाना आहे. तु आलीस की तो जातो तसा तसा माझा राग शहाना आहे. तुझी आठवण हा नित्य नवा अनुभव आहे. कधी उसळणार वादळ तर कधी पाकळीवरच दंव आहे. तु सोबत असलीस की मला माझा ही आधार लागत नाही. तु फक्त सोबत रहा मी दुसर काही मांगत नाही.कोणीतरी लागत आपल्याला वेडा म्हणणार वेडा म्हणताना आपल्यातलं शाहणपण जाणणार.

ओठात गुदमरलेले शब्द अलगत डोळयाकडे वळले पापण्या जरा थरथरल्या म्हणून गुपीत तुला कळले. तुझं आठवण ही मला किती सहन करावं लागंत ऊर भरून श्वास घेऊन पुन्हा गुदमराव लागत तुझं हे नेहमीचच झालंय आल्या निघण मी जाते मी निघते म्हणतांना थांबतो का ते बघणं. एकदा वाटल तुला स्पष्टच सांगाव मग वाटल कागदावर लिहावं, नंतर म्हटंल जाऊ दे तुझं तुलाच कळतयं का ते बघावं

खूपदा तुझ्या आठवणी पाऊलाने वाजवता येता. खूपदा तुझे गरत श्वास कानामागे जाणवंतात रात्र पटकन सरते तुला ऊराशी धरून मंग दिवसभर तुला फक्त पाडत रहतो मी परक्यासारखं दुरूनं . वेडया क्षणी भास होतो तु जवळ आपल्याचा डोळे ऊगीच दावा करतात तु स्पष्ट दिल्याचा कितीदा मी तुझ्याकडे परतलोय तुझ्या पासून दुर जायचं ठरवुन कितीदा मी तुला जिंकू दिलंय स्वताःला हरवुन. नजर तुलाशोधत राहते तु दिसे पर्यंत पापण्या आड लपून राहते तु समोर असे पर्यंत. सुखलेली पाने पडतात वारा सुटल्यावर तशी तुझी स्वप्ने पडतात मी डोळे मिटल्यावर.गपचं रहाव असं वाटतं तुझ्या जवळ बुसल्यावर वाटत तुच संगळ ओळखाव मी नुसतं हसल्यावर तुला डोळे भरूण पहाव असतं पण तु आलास की डोळे भरून येतात. आणि बोलायचं म्हटलं तर शब्दं मुकेपण धरून बसतात.

मला वाटत मी रूसल्यावर तु हळवी समजुत काढावी माझ्या गालावरची कळी मगं तुझ्या ओठा आड दळावी. रस्ता वळण घेत गेला पावल त्यावर पडतगेली आपल्या दोघातील प्रत्येक घटना अशी न ठरवता घडत गेली. वाटल तुला चोरून भेटतांना कुणी मला बघावं आणि त्याच्या देखत मी तुझ्या सवे निघावं. पुसणार कुणी असेल तर रडण्याला अर्थ आहे. जर तुझे डोळेच भरणार नसतील तर मरण सुध्दा व्यर्थ आहे. माझं मन तुझ्या प्रेमात बुडत होत ते बुडतांना सार जग पाहतं होत मदतीला फक्त तुझच मनं धावलं होत पण तुला तरी कोठे पोहायला येत होत.पाण्यामधल्या साखरेप्रमाणे विरघूळ दे तुझ्या प्रेमात ओठावर येऊ दे जे दडलय तुझ्या मनात. वादळांना भेटूनही जीवन अगदी संत आहे मीच मला भेटत नाही हीच मोठी खंत आहे. स्वप्नातील पावलांना चालणे कधीच कळलेच नाही पाऊल वाट चांगली असली तरी पाऊल हे वळलेच नाही. तुझ्यावर कमी टाकणार मला एक आव्हान आहे. तुझ्या प्रेमळ भावना पुढे माझा प्रत्येक शब्द गहान आहे. प्रेम करण म्हणजे एकमेकांकडे पहाने नाही तर दोघांने मिळून एकाच गोष्टीकडे पाहणे.

**शिंदे राऊ** बी.ए. प्रथम

# प्रेम आणि मैत्री

कॉलेज लाईफची सुरूवात म्हणजे तारूण्याची सुरूवात समजली जाते. अर्थात या वाक्यामध्ये मुलगा आणि मुलगी तारूण्याच्या उंबरठयावर उभे असतात त्यातूनच प्रेमाचा कवढसा कधी मनाच्या कपा-यात येतो हे दोघांनाही कळत नाही. पण यातही कांही व्टिस्ट असतात ज्यात काहींजण फार समजुतीने सामोरे जातात पण काहींना दुःखातून बाहेर पडण्याचा मार्गच सापडत नाही. खूप कमी जनांना त्यांचे प्रेम मिळते आणि इतरांना दुःख मिळते. पण शेवटी त्याचा त्रास करून घ्यायचा की नाही आणि घ्यायचा असेल तर तो किती प्रमाणात करून घ्यायचा हे ज्यांना त्यांनाच ठरवावे लागते.

मुले आणि मुली दोघांना ही एकतर्फी प्रेमाच्या त्रासातून जावे लागते. जगात असा कोणी नसेल की त्याने किंवा तिने प्रेमाच्या सुखा बरोबर त्यातील दुःख अनुभवले नाही मग हा त्रास का करून घेतो आपण ? किती ही प्रेम केले तरी शेवटी त्याने किंवा तिने नकार दिले असे म्हणून दुःख करत बसतो. किंवा अधी जे खरे प्रेम आहे असे वाटत असते ते किंवा कालावधीनंतर त्यांच्या किंवा तिच्या बोलण्यातून जाणवते. की त्याला आपण खरे प्रेम समोरच्या व्यक्तीने आपणावर करायला हवे नाहीतर कधी ना कधी तो स्वप्नाचा महल पडतोच पण समजा प्रेम नाही मिळाले तर त्यातून खरे प्रेम होते की नाही याचा विचार करावा का ? एकतर्फी प्रेमातच खरे खोटे पाहूच नये कारण त्यात केवळ आपनच असतो अन् दुसरा तर त्यांच्यातच विश्वासच असतो पण दोघांनीही एकमेंकांना संमती दिली असेल आणि तरी ते दोघे एकत्र होऊ शकले नाही तर ते खरे प्रेम नसते. कारण खरे प्रेम हे कधीच हार मानत नाही.

मुली जन्मताच भावूक असतात एखादा मुलगा आपली काळजी घेतोय त्याच्या विषयी आपल्याला जवळीक वाटते म्हणजे हाच आपल्या जीवनाचा जोडीदार असायला हवा अशी तिची इच्छा असते म्हणून ती त्याच्यात गुंतून जाते खूप खूप स्वप्ने पाहते या उलट मुले प्रेमात पडल्यावर लगेच लग्नाचे स्वप्न बघत नाही. मुलांना लग्न म्हणजे एक बंधन वाटते त्यांना फक्त मुलीचा सहवास हवा वाटतो.

तसेच मैत्रीच्या नात्यात बंधन नसतात तो मुलगा तुम्हाला केवळ मैत्रीन मानत असेल किंवा ती मुलगी केवळ मित्र मानत असेल तर त्याचा स्विकार करा त्यात (प्रेमात) अडकून स्वतःला कमी लेखून नैराश्य ओढावून घेऊ नका सत्य परिस्थिती जाणून घेऊन जर वेळीच मनाला आवर घातला तर दोघांचे ही जीवन सुख मय होईल मग अशा वेळी त्याला किंवा तिला आपला मित्र-मैत्रीन म्हणायला काय हारकत आहे ?
शेवटी प्रेमापेक्षा मैत्री चांगली मित्र हे जगातील सर्वात सुंदर नातं आहे.

**चव्हाण निकीता**
बी.ए. प्रथम

# सुखाचा मार्ग

आळस करू नका कमीत कमी आश्वासने द्या. नेहमी खरे बोलण्याचा प्रयत्न करा.
तुमच्या उत्पन्ना नूसार रहाणीमान ठेवा. कोणाशीही वाईट किंवा खोटे बोलू नका.
तुम्ही दुस-यांना दिलेल्या वेळेचे काटेकोर पणे पालन करा.
चांगल्या लोकांशी मैत्री करा अन्यथा करू नका.
मादक द्रव्य धुम्रपान करू नका,तिस्कळ चारित्र हे सर्वश्रेष्ठ आहे.
तुमची काही गुपिते असल्यास ती इतरांना सांगू नका.
शक्यतो दुस-याकडून उधार घेऊ नका.रोखीचे व्यवहार अधिक चांगला असतो.
बोलताना समोरच्या व्यक्तीच्या डोळयात पहा
तरूण पणी जास्तीत जास्त बचत करावी तीच म्हातारपणातील संपत्ती असेल.
परत करण्याची क्षमता असेल इतकेच कर्ज घ्या.
चांगले बोलणे व चांगले मित्र तुमचे व्यक्तिमत्व दर्शवितात.
तुम्ही चुकीचे वागल्या शिवाय कोणी तुमच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविणार नाही.
दैनंदिन काम काजाचा रोज रात्री आढावा घ्या.
तुम्हाला कोणी वाईट बोलून दोष देत असेल,
तर तो विवादण्याचा जाणिव पूर्वक प्रयत्न करा
संसार भावनेने करायचा असतो,नाही तर झोपडीत संसार कधीच फुलले असते.
ज्यांना भावना आणि व्यवहार यांची सांगड घालायला जमते तोच प्रपंचात यशस्वी होतो
प्रत्येक वेळी दुस-याची उणी-दुणी काढणे
आपल्या गरिबीचे आणि कमीपणाचे प्रदर्शन करणे होय.
इतरांच्या प्रगतीला उन्नतीला विनाकारण नावे ठेवणे
अत्यंत चुकीचे आणि आशिष्ट पणाचे लक्षण होय.
दुस-यांच्या चांगल्या कामाची व्यवहाराची अंतःकरणा पासून
प्रशंसा करावी यामध्येच तुमची मानसिकता आहे.
बोलणे संपल्यावर नेहमी धन्यवाद, पुन्हा भेटू असे शिष्टाचार युक्त शब्द वापरावेत.

**मुसांडे गणेश**
बी.ए. व्दितीय

## प्रेम करावे मनान

प्रेम करावे मनाने
त्याला होकार दयावे फुलाने
त्या गुलाबाच्या फुलाला
स्फुर्ती दयावे काटयाने ...
प्रेम करावे मनाने
त्याला हास्य दयावे चेह-याने
त्या गालावरच्या हास्याला
बहरून दयावे ओठाने ...
प्रेम करावे मनाने
त्याला समंती दयावे दोन्ही -हदयाने
-हदयावरच्या धाग्याला
जुळू दयावे भावनेने ....
झुळ-झुळण-या केसांना
झोका दयावे झुळूकाने
प्रेम करावे मनाने ....
त्याला आकार दयावे ढगाने
अंधारलेल्या रात्रीत
प्रकाश टाकावे चंद्राने
सारे अंग शहारून जावं
पावसाच्या एका थेंबाने
होकार दिले फुलाने म्हणून
प्रेम करावे मनाने ...
स्वप्नवेडया प्रेमाची
शब्द वेडे ग-हाने
नेहमीचेच ठरवलेले तेच ते बहाने
थोडयाशा साध्या सोप्या
अशाच काही प्रेमाच्या गोष्टी .....

**मनोहर दिपक**
बी.ए. तृतिय

## वाट

जरा चुकिचे जरा बरोबर बोलू काही ।
चला दोस्त हो आयुष्यावर बोलू काही ।।१।।
शब्द असू दे हातामध्ये काठी म्हणूनी ।
वाट आंधळी प्रवास खडतर बोलू काही ।।२।।
तूफान पाहून तीरावर कुलबुजल्या होडया ।
